ePaper

## संतोष देशमुख यांच्या पत्नीला तर विजय वाकोडे यांच्या मुलास सरकारी नोकरी!

|| वर्ष - 8 | अंक -179 || UDYAM-MH-26-0158827 ||




# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 8 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


### आतील पानांत


- हो माझी चूक होती : कॉन्स्टास
- फर्ग्युसनलाही आवरला नाही :
- राजीव कुमार यांची ठाकरेंवर टीका
- 'इंटरपोल'च्या धर्तीवर 'भारतपोल' पोर्टल


### पिंपरी- चिंचवडमध्ये वर्षभरात 33 घुसखोर बांगलादेशी, रोहिंग्याना पकडले

# सर्वाधिक बांगलादेशी भोसरीमध्ये!

## बनावट कागदपत्रांच्या आधारे राहत होते बांगलादेशी

| मुंबई | महाईन्यूज

**पिंपरी- चिंचवड : पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये गेल्या वर्षभरात ३३ घुसखोर बांगलादेशींना पिंपरी- चिंचवड पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. पिंपरी-चिंचवड शहर हे औद्योगिक नगरी म्हटलं जातं. या शहरात आणि परिसरात अनेक उद्योगधंदे आहेत. यामुळे देशातील अनेक राज्यांमधून विविध धर्माची आणि जातीची लोक शहरात वसलेली आहेत. अशातच घुसखोर बांगादेशीच प्रमाण वाढलं आहे.**



पिंपरी- चिंचवड शहरांमधील म्हाळुंगे, निगडी, पिंपरी, भोसरी, भोसरी एमआयडीसी, सांगवी, दापोडी, चाकण, तळेगाव एमआयडीसी आणि देहूरोड या परिसरात बांगलादेश आणि रोहिंग्ये यांना अटक केली आहे. सर्वाधिक बांगलादेशी हे भोसरी परिसरातून अटक करण्यात आले आहेत. भोसरी मध्ये वर्षभरात बारा बांगलादेशींना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. हे सर्व बांगलादेशी हे बनावट कागदपत्रांद्वारे परिसरात राहत होते. आधार कार्ड, पॅन कार्ड यासह इतर कागदपत्र ही नेहमीच या बांगलादेशकडून जप्त करण्यात आलेले आहेत.

या बांगलादेशींना नेमकं बनावट कागदपत्र कोण बनवून देतो. या मुळापर्यंत पोहचणे देखील पोलिसांची जबाबदारी आहे. वर्षभरात पकडण्यात आलेले ३३ बांगलादेशांना आणि रोहिंग्यांपैकी काही जणांचे पासपोर्टदेखील पोलिसांनी रद्द केलेले आहेत. बांगलादेशी आणि रोहिंग्ये यांना शोधण्याची मोहीम अधिक तीव्र करणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिली आहे.

### घुसखोरांवर वर्षभरात कारवाई

दरम्यान काही नागरिक हे देश विघातक कारवायांमध्ये देखील सहभागी होत असल्याने पोलीस अशा बेकायदेशीर वास्तव्यास असणाऱ्या घुसखोरांविरोधात सतत मोहीम राबवत असते. त्या मोहिमेत आतापर्यंत पिंपरी चिंचवड पोलिसांनी २९ बांगलादेशी आणि ४ रोहिंग्यां घुसखोरांवर मागील वर्षभरात कारवाई केली आहे. अजून देखील तपस लागल्यास त्यांना ताब्यात घेण्यात येत आहे.

### 62 पारपत्र केले रद्द

पिंपरी चिंचवड पोलिसांनी वर्षभरात केलेल्या कारवायांमध्ये ३३ जणांना ताब्यात घेतले होते. तसेच बनावट कागदपत्राच्या सहाय्याने तयार करण्यात आलेले ६२ पारपत्र देखील पिंपरी-चिंचवड शहर पोलिसांनी रद्द केले आहेत. पोलिसांची हि कारवाई अविरत पणे सुरु असल्याने वेगवेगळ्या भागांमध्ये वास्तव्यास असलेल्या बांग्लादेशींना ताब्यात घेतले जात आहे.

---

# शहरातील सर्दी, खोकल्याच्या रुग्णांबाबत सतर्कता!

## 'एचएमपीव्ही'चा संभाव्य प्रादुर्भाव : आमदार महेश लांडगे यांची महापालिका भवनात आढावा बैठक

| पिंपरी-चिंचवड | प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात ह्युमन मेटान्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) या साथरोगाचा धोका वाढू लागला आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिका सतर्क झाली आहे. शहरातील सर्दी खोकल्याच्या रुग्णांचे आता 'सर्वेक्षण' करण्यात येणार आहे. याबाबत महापालिका प्रशासन अधिकारी तथा आयुक्त शेखर सिंह यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे.**



ह्युमन मेटान्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) च्या संभाव्य धोक्याबाबत सतर्कता आणि खबरदारीच्या निमित्ताने भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी महापालिका भवन येथे आयुक्त शेखर सिंह आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उपायुक्त मनोज लोणकर, शहर अभियंता मकरंद निकम, पर्यावरण विभागाचे संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता बाबासाहेब गलबले आदी उपस्थित होते. आमदार महेश लांडगे म्हणाले की, शहरात संसर्गजन्य आजाराबाबत प्रशासनाने दक्षता घेण्याची आवश्यकता आहे. सर्दी, खोकल्याचे रुग्ण महापालिकेच्या दवाखान्यात आल्यास त्यांची स्वतंत्र नोंद ठेवावी. अशा रुग्णांची संख्या आणि त्यांची लक्षणे यावर बारकाईने लक्ष ठेवले जावे. सर्दी खोकल्याच्या रुग्णांची संख्या वाढत आहे का? आणि त्यांच्यात इतर कोणती लक्षणे दिसून येत आहेत का? याची तपासणी व्हावी. तसेच, शहरातील सर्दी, खोकल्याच्या रुग्णाचे सर्वेक्षण करावे.

> पिंपरी चिंचवड हे औद्योगिक नगरी असल्यामुळे विविध ठिकाणाहून नागरिक सातत्याने कामानिमित्ताने ये -जा करतात. नागपूरमध्ये या आजाराचे दोन रुग्ण आढळल्याचे वृत्त आहे. त्यामुळे शहरात कटाक्षाने खबरदारी घ्यावी लागणार आहे. त्यामुळे एकीकडे अशा रुग्णांची नोंद घेण्याबरोबरच एचएमपीव्हीबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना हाती घेतल्या जाव्यात अशा सूचना प्रशासनाला केल्या आहेत. नागरिकांचे आरोग्य हे प्रथम कर्तव्य आहे. प्रशासनाकडून त्या दृष्टीने हालचाली देखील सुरू करण्यात आले आहेत. या शहरातील नागरिकांना आरोग्याच्या समस्येबाबत कोणतीही गैरसोय होणार नाही याबाबत काळजी घेतली जाणार आहे.
>
> **-महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# एचएमपीव्ही: पालिका ॲक्शन मोडवर!

## सात कोटींची रक्कम पालिकेकडे पडून? नक्की काय आहे प्रकार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ह्युमन मेटान्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) या साथरोगाचा धोका वाढू लागला आहे. या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेने खबरदारीची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. नायडू संसर्गजन्य रुग्णालयात विलगीकरणासाठी ५० रुग्णशय्या आणि ५ अतिदक्षता रुग्णशय्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. याचबरोबर शहरातील सर्दी, खोकल्याच्या रुग्णांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे.**



महापालिकेच्या आरोग्य विभागाने राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एचएमपीव्हीचा संसर्गाबाबत खबरदारीची पावले उचलली आहेत. करोना साथीनंतर महापालिकेने भविष्यात संसर्गजन्य आजाराची साथ आल्यास नायडू रुग्णालयात रुग्णशय्यांची व्यवस्था केली आहे. त्यानुसार, त्यात नायडू संसर्गजन्य रुग्णालयात विलगीकरणासाठी ५० रुग्णशय्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. भविष्यात एचएमपीव्हीची साथ वाढल्यास त्यासाठी नायडू रुग्णालयांत विलगीकरणासाठी ३५० रुग्णशय्यांची व्यवस्था आहे. याचबरोबर खासगी रुग्णालयांची मदत घेऊन विलगीकरणासाठी ३ हजार ५०० रुग्णशय्यांची व्यवस्था करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे.सर्दी, खोकल्याचे रुग्ण महापालिकेच्या दवाखान्यात आल्यास त्यांची स्वतंत्र नोंद ठेवण्याचे निर्देश महापालिकेच्या आरोग्य प्रमुख डॉ. नीना बोराडे यांनी दिले आहेत. या रुग्णांची संख्या आणि त्यांची लक्षणे यावर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. रुग्णांची संख्या वाढत आहे का आणि त्यांच्यात इतर कोणती लक्षणे दिसून येत आहेत का, याची तपासणी सातत्याने केली जाणार आहे. यामुळे रुग्णांची संख्या वाढल्यास आणि इतर लक्षणे दिसून आल्यास आरोग्य विभाग तातडीने पावले उचलू शकणार आहे.करोनाच्या काळात पुणे महानगरपलिकडे खासगी कंपन्यांकडून कंपनी सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या (सीएसआर) माध्यमातून आलेला साडेसात कोटी रुपयांचा निधी पडून असल्याची माहिती समोर आली आहे. या रकमेतून केवळ व्याज मिळविण्यामध्येच महापालिका गुंतली असल्याचा आरोप मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी केला. देशात करोनाची साथ असताना पुणे महापालिकेने खासगी कंपन्या तसेच नागरिकांना आर्थिक मदतीचे आवाहन केले होते. याला प्रतिसाद देऊन विविध कंपन्यांनी आपल्या सीएसआर फंडामधून कोट्यवधी रुपयांचा निधी महापालिकेकडे जमा केला. यातील निधी खर्च करण्यास महापालिका असमर्थ ठरल्याचा आरोप वेलणकर यांनी केला. वेलणकर म्हणाले,'२०२०-२१ मध्ये ४ कोटी ८९ लाख, तर २०२१-२२ मध्ये महापालिकेला ३ कोटी १० लाख रुपयांच्या देणग्या मिळाल्या. मात्र,मध्ये यातील एकही पैसा खर्च केला नाही, तर २०२१-२२ मध्ये करोनाच्या रुग्णांसाठी खाटा तसेच ऑक्सिजनचा पुरवठा करण्यासाठी एक कोटी ३० लाख रुपये खर्च केले. हा खर्च केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या रकमेवर महापालिकेला ७० लाख रुपयांचे व्याज मिळाले आहे.

### 7 कोटी 43 लाख रुपये पडून

सध्या पालिकेच्या कोविड सीएसआर खात्यात ७ कोटी ४३ लाख रुपये पडून आहेत.' महापालिका देणग्यांच्या माध्यमातून मिळालेल्या या निधीचा वापर करीत नसल्याची बाब दीड वर्षापूर्वी प्रशासनाच्या लक्षात आणून देण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप वेलणकर यांनी केला. पालिकेला मिळालेल्या साडेसात कोटी रुपयांच्या निधीतून शहरातील रुग्णालयांमध्ये आवश्यक यंत्रसामग्रीची खरेदी करून गरजू पुणेकर रुग्णांची सोय करावी, अशी मागणीही त्यांनी केली. करोनाच्या काळात महापालिकेने केलेल्या कामांची बिले अद्यापही प्रलंबित आहेत. ही बिले देण्याचा निर्णय झाल्यानंतर या निधीतून ती दिली जाणार आहेत. हा निधी खर्च झाल्यास प्रलंबित बिले देण्यासाठी हक्काचा निधी राहणार नाही. तसेच, हा निधी इतर ठिकाणी वापरता येईल का? याची शहानिशा करून निर्णय घेतला जाईल, असे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले म्हणाले.

# आरोग्य विभागाचे खासगी रुग्णालयांवर 'लक्ष'!

## राज्यभरात नियमभंग शोधून कारवाईची मोहीम

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील खासगी रुग्णालयांची तपासणी करण्याचे पाऊल आरोग्य विभागाने उचलले आहे. यासाठीची नियमावली आरोग्य विभागाने तयार केली आहे. या नियमावलीनुसारच रुग्णालयांची तपासणी केली जाणार आहे. दरम्यान, डॉक्टरांना नाहक त्रास देऊ नये, अशी सूचनाही अधिकाऱ्यांना करण्यात आली आहे.**




राज्यातील सर्व खासगी रुग्णालयांची तपासणी आरोग्य विभागाकडून केली जाणार आहे. त्यात खासगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या आणि किमान एक रुग्णशय्या असलेल्या रुग्णालयांचा समावेश असेल. याचबरोबर ॲलोपथी, आयुष, युनानी, नॅचरोपथी यासह सर्व शाखांच्या रुग्णालयांची तपासणी केली जाणार आहे.

रुग्ण २४ तास दाखल करून घेतला जात नाही अशा डे केअर सेंटरचा यात समावेश नसेल. या तपासणीची पुणे विभागाचे आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकिशन पवार यांनी नियमावली तयार केली आहे. ही तपासणी १५ दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी महापालिकेचे आरोग्यप्रमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि शल्यचिकित्सक यांना दिले आहेत.रुग्णालयाची बॉम्बे नर्सिंग होम ॲक्टनुसार नोंदणी झाली आहे का, याची तपासणी केली जाणार आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी १५ दिवसांत त्यांच्या कार्यक्षेत्रातील रुग्णालयांची तपासणी करावी.

ही तपासणी पूर्ण झाल्यानंतर त्याचा अहवाल संबंधित जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक आणि महापालिकेच्या आरोग्य प्रमुखांना सादर करावा. यानंतर या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्रुटी आढळलेल्या रुग्णालयांना नोटीस बजावून एक महिन्यात सुधारणा करण्यास सांगावे. त्यानंतर १५ दिवसांत पुन्हा पाहणी करून तपासणी करावी, असेही नियमावलीत नमूद केले आहे.

### नोंदणी नसलेल्या रुग्णालयांची यादी

आशा, आरोग्यसेवक, आरोग्यसेविका नोंदणी नसलेल्या रुग्णालयांची यादी तयार करतील. या रुग्णालयांना नोंदणी करून घेण्यास सांगितले जाईल. डॉक्टरांनी दर वर्षी नोंदणी शुल्क भरणे बंधनकारक आहे. नोंदणी नूतनीकरण करताना सुधारित दराने शुल्क घ्यावे. रुग्णालयातील डॉक्टर आणि परिचारिकांची निकषाप्रमाणे संख्या आणि रुग्णालयाबाहेर लावलेले दरपत्रक या बाबींची तपासणी करावी. रुग्णालयाकडील अग्निशामक दलाच्या ना हरकत प्रमाणपत्राची तपासणी करावी. रुग्णालयाच्या जैववैद्यकीय कचऱ्याच्या विल्हेवाटीबद्दल माहिती घ्यावी. रुग्णालयातील रुग्णांशी संवाद साधून त्यांचा अभिप्राय घ्यावा, असे नियमावलीत म्हटले आहे.

## रेडझोन हद्दीबाबत संभ्रमावस्था कायम

# ‘रेडझोन’ला ‘लाल दिवा ?’

### ‘सॅटेलाइट’द्वारे मोजणी करून दहा महिने उलटूनही अंतिम नकाशाची प्रतीक्षा

| पिंपरी-चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी देहूरोड आणि दिघी भागातील संरक्षित जागेची (रेड झोन) राज्य शासनाच्या भूमी अभिलेख विभागाने ‘सॅटेलाइट’द्वारे मोजणी करून दहा महिने उलटून गेले, तरी अंतिम नकाशा तयार झालेला नाही. नकाशाअभावी रेड झोन सीमेबाबत संभ्रमावस्था कायम आहे.**




पिंपरी-चिंचवड शहरालगत देहूरोड आणि दिघीत संरक्षण विभागाचे क्षेत्र आहे. देहूरोड दारूगोळा कारखान्याच्या आणि दिघी मॅगझिन डेपोच्या बाह्य सीमाभिंतीपासून दोन हजार यार्ड (१.८२ किलोमीटर) परिघामध्ये रेड झोन आहे. रेड झोनमधील निवासी आणि व्यावसायिक मालमत्तांचे अचूक सीमांकन, त्यांची संख्या स्थानिक प्रशासनाकडे नाही. रेड झोनमध्ये बांधकाम करता येत नसतानाही अनधिकृतपणे निवासी बांधकामे मोठ्या प्रमाणात झाली आहेत. रेड झोन क्षेत्रात गेल्या ४० वर्षांपासून तीन हजारांहून अधिक औद्योगिक आस्थापना कार्यरत आहेत. जुने, बैठे घर असलेल्या रहिवाशांना नव्याने बांधकाम करता येत नाही. रेड झोनच्या हद्दीमध्ये नागरिकांमध्ये संभ्रम असल्याने मोजणीची मागणी केली जात होती.

दिघी, भोसरी, वडमुखवाडी, तळवडे, रुपीनगर, यमुनानगर, निगडी, रावेत, किवळे भागात रेड झोन क्षेत्र आहे. तसेच, सांगवी, पिंपळे गुरव, पिंपळे निलख, पिंपरीगाव, कासारवाडी, दापोडी या भागांना लागूनही लष्करी आस्थापना आहेत. देहूरोड दारूगोळा कारखाना आणि दिघी मॅगझिन डेपोमुळे रेड झोन क्षेत्र जाहीर आहे. त्या हद्दीत बांधकामे करता येत नाहीत. सीमारेषेबाबत नागरिकांमध्ये संभ्रम होता. त्यामुळे संरक्षण विभागाच्या परवानगीनुसार एक कोटी १३ लाख रुपये खर्च करून रेड झोन हद्दीची नव्याने मोजणी करण्यात आली आहे.

संरक्षण विभागाच्या मदतीने, तसेच महापालिकेच्या सहकार्याने भूमी अभिलेख विभागाकडून रेड झोनचे सर्वेक्षण करण्यात आले. आता त्याचे नकाशात रूपांतर करून तो अंतिम नकाशा महापालिकेला उपलब्ध करून दिला जाणार आहे. सर्वेक्षण पूर्ण केल्यानंतर अवघ्या दोनच महिन्यांत अंतिम नकाशा तयार करून देण्याची ग्वाही भूमी अभिलेख विभागाने महापालिकेला दिली होती. परंतु, सर्वेक्षण होऊन दहा महिने उलटले, तरी नकाशा तयार झालेला नाही. परिणामी, महापालिकेच्या नगररचना, बांधकाम परवानगी आणि करसंकलन या विभागांकडून प्रशासकीय कार्यवाहीस अडथळे येत आहेत.

रेड झोन हद्दीचे सर्वेक्षण करताना भूमी अभिलेख विभागाला पूर्ण सहकार्य केले. सर्व हद्दी दाखवून दिल्या. आता त्याची नकाशावर नोंद केली जात आहे. रेड झोनचा अचूक नकाशा तयार करण्यात येत आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमुळे विलंब झाला आहे. येत्या पंधरा दिवसांत नकाशा उपलब्ध होण्याची शक्यता असल्याचे नगररचना विभागाचे उपसंचालक प्रसाद गायकवाड यांनी सांगितले.

#### रेड झोनचे प्रतिबंध क्षेत्र

यमुनानगर, निगडी, प्राधिकरण, भक्ती-शक्ती समूहशिल्प, रुपीनगर, तळवडे, टॉवर लाइन, कृष्णानगर, साने चौक, चिखली, दिघी, भोसरी, वडमुखवाडी, मोशी, बोपखेल आदी भागास रेड झोनचे प्रतिबंध लागू आहेत. महापालिकेकडून या भागात बांधकाम परवानगी दिली जात नाही. परिणामी, अनधिकृत बांधकामांची संख्या वाढत आहे. त्यात बहुमजली इमारतींचा समावेश आहे.

---

## निगडीपर्यंत मेट्रोमुळे वाढणार कनेक्टिव्हिटी!

### पुणे मेट्रोच्या स्वारगेट ते पिंपरी मार्गिकेचा भक्तीशक्ती चौकापर्यंत विस्तार

| पिंपरी |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे मेट्रोच्या स्वारगेट ते पिंपरी (पीसीएमसी) मार्गिकेचा निगडीतील भक्तीशक्ती चौकापर्यंत विस्तार केला जाणार आहे. त्याचे काम सुरू झाले आहे. यामुळे मुंबई-पुणे महामार्गाच्या परिसरातील चिंचवड, आकुर्डी, निगडी या गावांसह चिखली, तळवडे, संभाजीनगर, शाहूनगर, यमुनानगर, प्राधिकरण, रावेत, किवळे, मामुर्डी या गावांचीही कनेक्टिव्हिटी वाढणार आहे.**



पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील पुणे मेट्रोच्या दोन मार्गांवर प्रवासी सेवा सुरू झाली आहे. स्वारगेट ते पिंपरी (पिंपरी-चिंचवड महापालिका भवन – पीसीएमसी) आणि पुण्यातील वनाज ते रामवाडी असे हे दोन मार्ग आहेत. या दोन्ही मार्गावर प्रवासी वाहतूक सुरू झाली आहे. त्यामुळे पिंपरी, चिंचवड, भोसरी, पूर्णानगर, मोरवाडी, नेहरूनगर, संत तुकारामनगर, पिंपळे सौदागर, सांगवी, दापोडी, कासारवाडी, फुगेवाडी, काळेवाडी, जाधववाडी, मोशी आदी भागातील नागरिकांना पुण्यात जाणे सोयीचे झाले आहे. या भागांना जोडण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) मेट्रो स्थानकांशी जोडणारी बससेवा सुरू केली आहे.

काही जण स्वतःच्या दुचाकीने किंवा रिक्षाने मेट्रो स्थानकांपर्यंत येऊन पुढील प्रवास मेट्रोने करत आहेत. त्यामुळे शहरातील पिंपरी, संत तुकारामनगर, नाशिक फाटा, कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी स्थानकांवर प्रवाशांची संख्या वाढू लागली आहे. कारण, पुणे न्यायालय स्थानकावर उतरून कोथरूड, कर्वेनगर, वनाज आणि पुणे स्टेशन, येरवडा, रामवाडी भागात जाणे सहज सोपे झाले आहे. आता या स्वारगेट-पिंपरी मार्गिकेचा विस्तार निगडीतील भक्ती-शक्ती चौकापर्यंत केला जाणार आहे. त्याचे काम सुरू झाले आहे. पुढील दोन वर्षांत प्रवासी सेवा सुरू होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे शहराच्या उर्वरित भागातील विशेषतः मुंबई-पुणे महामार्गाच्या दोन्ही बाजूच्या गावांची कनेक्टिव्हिटी मेट्रोने वाढणार आहे. शिवाय, हे दोन्ही बाजूंची गावेही पीएमपीने मेट्रो स्थानकाशी जोडली जाणार आहेत.

#### पीएमपीची बससेवाही...

शहराच्या उत्तरेकडील शेवटचे टोक म्हणजे किवळे व मामुर्डी ही गावे आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिका भवनापासून (पिंपरी मेट्रो स्थानक) साधारण १२ ते १५ किलोमीटरवर ही गावे आहेत. ती आता किवळेतील मुकाई चौकापासून पिंपरी मेट्रो स्थानकाशी पीएमपीने जोडली गेली आहेत. अर्थात पिंपरी मेट्रो स्थानक ते मुकाई चौक किवळे अशी बससेवा पीएमपीने सुरू केली आहे.

# अरे, भीक नको, पण कुत्री आवरा!




**सध्याच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रचंड वजनदार घराण्यातील राजकारणी, माजी खासदार डॉ. सुजय विखे-पाटील यांनी एक विधान केले. त्याला एवढी प्रसिद्धी मिळाली, की गेले दोन दिवस सोशल मीडियावर अक्षरशः हैदोस सुरू आहे. यांना कोणाला शिर्डीच्या संस्थानशी किंवा श्री साईबाबांशी देणं घेणं नाही, या अशा मंडळींनी ही या नाजूक विषयात उडी घेऊन विषय प्रचंड ताणला आहे.**



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

प्रत्यक्षामध्ये, शिर्डी संस्थानतर्फे विनामूल्य भोजनालय चालवले जाते. हे भोजनालय देवस्थानने चालवलेले असल्यामुळे त्याला भोजनालय न म्हणता प्रसादालय असे म्हटले जाते. शिर्डीमध्ये येणाऱ्या हजारो भाविकांना प्रसाद म्हणून विनामूल्य भोजन देण्याची व्यवस्था याकेली जाते. विखे घराण्यातील चौथ्या पिढीतील नेते डॉ. विखे यांनी हे भोजनालय बंद करा आणि त्या ऐवजी सवलतीच्या दरात सशुल्क प्रसादालय चालू करा, अशी एक अत्यंत व्यवहार्य सूचना केली. पण, बोलण्याच्या ओघात ते बोलून गेले, की या भोजनालयामुळे भिकाऱ्यांचे तांडे शिर्डीकडे वळत आहेत.

## नाजूक विषय, गदारोळ अपेक्षितच !

अर्थात् च या विधानावर गदारोळ उठणे अपेक्षितच होते. दुर्दैवाने, आपल्याकडे संवेदना आणि जाणीवा अतिशय टोकाच्या असतात आणि त्या टोकदार नसल्या तर त्यांना टोकदार करण्याचे काम अनेक 'उपटसुंभ' नेते आणि त्यांचे चेले चपाटे करत असतात. डॉ. विखे यांच्या विधानामध्ये काहीही गैर आहे, असे वाटत नाही. एक तर या, शिर्डी संस्थानकडे अमाप संपत्ती आहे. त्यामुळे ते मोफत प्रसादालय चालू ठेवण्याइतके आर्थिकदृष्ट्या सबळ आणि सक्षम आहेत. परंतु, याचे गंभीर सामाजिक परिणाम काय होत आहे, याच्याकडे मात्र सोयीस्कर दुर्लक्ष केले जाते, हे सुद्धा लक्षात घ्यायला हवे.

देशामध्ये जवळपास प्रत्येक गुरुद्वारामध्ये लंगरची प्रथा गेली कित्येक वर्षे सुरू आहे. अमृतसरच्या सुवर्ण मंदिरात तर चोवीस तास लंगर चालू असते. अगदी अवेळी आलेला भाविक सुद्धा उपाशीपोटी जाऊ नये, हा तेथील रिवाज आहे आणि येणारे भाविकही प्रसाद म्हणून थोडे कां होईना, पण त्या लंगरमध्ये भोजन करून जातात. ठिकठिकाणच्या गुरुद्वारांमध्ये अशीच लंगरची व्यवस्था केलेली असते. प्रत्येक ठिकाणी अगदी चोवीस तास नसली तरी दोन तास, चार तास अशी तिथल्या आवश्यकतेप्रमाणे लंगर चालू ठेवली जातात आणि त्याचा लाभही असंख्य भाविक घेत असतात.

गुजरातमध्ये काही मंदिरांमध्ये दुपारच्या भोजनाची व्यवस्था विनामूल्य केली जाते आणि विशेष म्हणजे दर्शनाला आलेल्या भाविकांना तेथील सेवक हे अगदी हात जोडून विनवणी करून प्रसाद घेऊन जाण्याची विनंती करत असतात. आपल्याकडे शेगाव, गोंदवले, अक्कलकोट येथेही मोफत भोजनालये चालतात. हे सगळे सांगण्याचे कारण एवढेच की या सर्व ठिकाणी कोठेही स्थानिक नागरिक या सुविधेचा लाभ किंवा गैरफायदा घेताना पाहिले नाहीत, तशा तक्रारी सुद्धा नसतात. स्थानिक नागरिक हा दर्शनाला येतो आणि दर्शन घेऊन लगेच परत जातो. भोजनाची आणि प्रसादाची व्यवस्था ही मुख्यत्वे करून परगावाहून आलेल्या भाविकांसाठी केली जाते. म्हणून अशा ठिकाणी भोजनाच्या वेळेस भिक्षेकऱ्यांच्या रांगा मंदिराबाहेर लागत नाहीत.

अनेक ठिकाणी प्रसाद म्हणून लाडू किंवा शिरा दिला जातो. अनेक गुरुद्वारांमध्ये भाविक पहिल्यांदा प्रसादाचा शिरा खरेदी करून तेथील सेवकांजवळ देतात आणि नंतर प्रसादाच्या रांगेत उभे रहातात. तेथेही कधी असे भिकारी बघितले नाहीत. लंगर मध्ये येणारे भाविक तर प्रसादाच्या आधी तिथल्या दानपेटी मध्ये आपल्या कुवतीनुसार त्या भोजनाचे मूल्य समर्पण करतात. अगदी देवाच्या दारातूनही काही प्रवृत्ती तेथे दिसत नाही. आपला समाज धार्मिक आहे आणि जास्तीत जास्त देण्याकडे त्याची प्रवृत्ती असते, हे मान्य करावेच लागेल.

## फुकट्यांची मनस्वी चीड

अनेक वेळा महाराष्ट्रामध्ये धार्मिक स्थळांना भेटी दिल्या असताना मात्र अनुभव मात्र अत्यंत वेदनादायी आले आहेत. रुग्णालयये आणि तीर्थक्षेत्रे येथे भिकाऱ्यांची अक्षरशः मांदियाळी म्हणजेच झुंबड दिसते. अशा ठिकाणी सर्वसाधारणपणे माणूस काहीसा भावुक आणि संवेदनशील झालेला असतो आणि नेमक्या याच मानसिकतेचा फायदा हे भिक्षेकरी घेत असतात.

शरीराने अपंग अथवा व्याधीग्रस्त असा कोणी असेल तर त्याला भोजनासाठी मदत करण्यामध्ये कोणालाच कधी वाईट वाटणार नाही. परंतु शरीराने अत्यंत धडधाकट आणि केवळ कुठलेही काम करायचे नाही, अशा ऐतखाऊ मानसिकतेमध्ये जेव्हा हे भिकारी फुकट मिळणाऱ्या गोष्टींसाठी रांगा लावतात त्यावेळी केवळ चीड येते.ही मनोवृत्ती मंदिर व्यवस्थापनाकडून अशा फुकट भोजनालयांमधून जोपासली जात असते. पंढरपूर, आळंदी, शिर्डी अशा कितीतरी ठिकाणी हा प्रकार राजरोसपणे दिसतो.

पूर्वी, एकदा सरकारने कल्याणजवळ एक भिक्षेकरी आश्रम काढला होता आणि पुण्या-मुंबईमधून रस्त्यावर भीक मागणारे भिकारी पकडून त्यांना या आश्रमात नेऊन ठेवले होते. परंतु,हे सर्वजण तेथून पळून कोणाला काहीही फुकट द्यायला नको ! कुठलीही गोष्ट कोणाला फुकट देऊ नये, हे मत दिवसेंदिवस समाजामध्ये अधिक घट्ट होत चालले आहे. फुकट दिलेल्या वस्तूची किंमत नसते, मग ती भिकाऱ्याला दिलेली भीक असो किंवा झोपडपट्टीवाल्यांना दिलेली मोफत घरे. त्याची किंमत नसणारच !

असो, ज्या कोणाला डॉ. विखे यांच्या विधानाचा विपर्यास करून धार्मिक संवेदना आणि जाणीवा टोकदार करायच्या असतील, त्यांनी त्या खुशाल कराव्यात, पण बराच मोठा समाज अत्यंत खुल्या मनाने विखे यांचे अभिनंदन आणि अनुमोदन करतो. कुठलेही तीर्थस्थान आणि मंदिराकडे जाणारे रस्ते हे गलिच्छ करण्यामध्ये सर्वात मोठा हातभार या भिकाऱ्यांनी लावलेला आहे आणि त्यांना तसं करू देण्यास आपल्यासारखे आंधळे भाविक प्रोत्साहन देत आहेत. देवस्थान व्यवस्थापनाने याबाबत अत्यंत डोळस आणि कठोर निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

मंदिर आणि मंदिर परिसरातील स्वच्छता, पावित्र्य आणि आरोग्य या दृष्टीने असे निर्णय अतिशय आवश्यक आहेत. परंतु तसे होईल अशी मानसिकता आज तरी समाजात आणि देवस्थानांमध्ये दिसत नाही, आत्ता डॉ. विखे यांच्या पाठीशी ठाम उभे राहू या, वेगवेगळ्या समाज माध्यमांच्या माध्यमातून भुंकणाऱ्या कुत्र्यांना आवरा, अशी एकमुखी मागणी करू या. श्री साईबाबांचा 'श्रद्धा आणि सबुरी' सहा मंत्र जपू या आपल्या हातात दुसरे आहे तरी काय ?


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# विषाणूला घाबरण्याचं कारण नाही!

## रुग्णालय अधिष्ठातांनी सज्ज राहणं आवश्यक : मुश्रीफ

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जगातील अनेक देशांमध्ये ह्युमन मेटा न्युमोनिया व्हायरस ( HMPV ) विषाणूचा प्रभाव दिसून येत आहे. आपल्या देशात आजपर्यंत एकूण सात रुग्ण कर्नाटक, तामिळनाडू महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यात आढळून आले. त्यापैकी एक रुग्ण पूर्णपणे बरा होवून घरी गेला आहे. उर्वरित रुग्ण बरे होत आहेत. हा आजार गंभीर नसून लहान मुलं, वृद्ध आणि इतर गंभीर आजार असणाऱ्यांनी काळजी घ्यावी असं वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितलं.**



मंत्रालयीन दालनात एचएमपीव्ही विषाणू संदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव दिनेश वाघमारे, आयुक्त राजीव निवतकर, संचालक डॉ अजय चंदनवाले, आयुष विभागाचे संचालक डॉ रमण घुंगराळकर याबरोबरच राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयचे अधिष्ठाता दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. मंत्री मुश्रीफ म्हणाले,राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले की काही राज्यांमध्ये एचएमपीव्ही प्रकरणे आढळून आलेली आहेत. पण आपल्या राज्यातील नागरिकांनी घाबरून जाऊ नये कारण सरकार लवकरच या परिस्थितीबद्दल सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्वं लागू करणार आहे. तसंच या आजारासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू करुन साथ पसरू नये म्हणून सगळी काळजी घेण्यात येईल.राज्यात एचएमपीव्हीचे दोन रुग्ण आढळले आहेत. मात्र काळजीचं कारण नाही. सगळ्या रुग्णालयांतील अधिष्ठातांनी संभाव्य प्रसंगाला सामोरे जाण्यासाठी औषधांसह ऑक्सिजन आणि आवश्यकता वाटल्यास विलगीकरण यासाठी तयारीत रहावं. अतिरिक्त व मुबलक औषधांसाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्याकडे संपर्क करावा, अशा सूचनाही हसन मुश्रीफ यांनी दिल्या आहेत. एचएमपीव्हीचा प्रादुर्भाव राज्यात होऊ नये यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत अशा सूचनाही मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिल्या.HMPV विषाणूसंबंधी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करून नागरिकांना मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे आवाहन हसन मुश्रीफ यांनी केलं आहे. प्रतिबंधात्मक उपाय व सतर्कतेचा एक भाग म्हणून नागरिकांनी खोकताना किंवा शिंकताना तोंड व नाक रुमालाने नाक व तोंड झाकण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केलं आहे. साबण आणि पाण्याने किंवा सॅनिटायझरने आपले हात वारंवार धुणे, ताप तसं खोकला आणि शिंका अथवा सर्दी पडश्या सारखे लक्षणे असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेऊन रुग्णांनी सार्वजनिक ठिकाणांपासून दूर रहावे व वैद्यकीय सल्यानुसार औषधं घ्यावीत. भरपूर पाणी पिणे आणि पौष्टिक आहाराचे सेवन करावं. यामुळे रोगाचा प्रसार कमी होण्यास मदत होईल. वैद्यकीय शिक्षण विभागाने विशेष करून संशयित रुग्णांपासून दूर राहून सदर रोगाचा प्रादुर्भाव कमी करण्यास मदत होईल असंही मुश्रीफ यांनी स्पष्ट केलं. मंत्रालयीन दालनात एचएमपीव्ही विषाणू संदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव दिनेश वाघमारे, आयुक्त राजीव निवतकर, संचालक डॉ अजय चंदनवाले, आयुष विभागाचे संचालक डॉ रमण घुंगराळकर याबरोबरच राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयचे अधिष्ठाता दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. मंत्री मुश्रीफ म्हणाले,राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले की काही राज्यांमध्ये एचएमपीव्ही प्रकरणे आढळून आलेली आहेत. पण आपल्या राज्यातील नागरिकांनी घाबरून जाऊ नये कारण सरकार लवकरच या परिस्थितीबद्दल सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्वं लागू करणार आहे. तसंच या आजारासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू करुन साथ पसरू नये म्हणून सगळी काळजी घेण्यात येईल. राज्यात एचएमपीव्हीचे दोन रुग्ण आढळले आहेत. मात्र काळजीचं कारण नाही.

### पौष्टिक आहाराचे सेवन करावं

अतिरिक्त व मुबलक औषधांसाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्याकडे संपर्क करावा, अशा सूचनाही हसन मुश्रीफ यांनी दिल्या आहेत. एचएमपीव्हीचा प्रादुर्भाव राज्यात होऊ नये यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत अशा सूचनाही मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिल्या.HMPV विषाणूसंबंधी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करून नागरिकांना मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे आवाहन हसन मुश्रीफ यांनी केलं आहे. प्रतिबंधात्मक उपाय व सतर्कतेचा एक भाग म्हणून नागरिकांनी खोकताना तोंड झाकण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केलं आहे. साबण आणि पाण्याने किंवा सॅनिटायझरने आपले हात वारंवार धुणे, ताप तसं खोकला आणि शिंका अथवा सर्दी पडश्या सारखे लक्षणे असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेऊन रुग्णांनी सार्वजनिक ठिकाणांपासून दूर रहावे व वैद्यकीय सल्यानुसार औषधं घ्यावीत. भरपूर पाणी पिणे आणि पौष्टिक आहाराचे सेवन करावं. यामुळे रोगाचा प्रसार कमी होण्यास मदत होईल. वैद्यकीय शिक्षण विभागाने विशेष करून संशयित रुग्णांपासून दूर राहून सदर रोगाचा प्रादुर्भाव कमी करण्यास मदत होईल असंही मुश्रीफ यांनी स्पष्ट केलं.

# जिल्हा पालक सचिवांकडे महत्त्वाची जबाबदारी

## सर्वसामान्यांना सरकारी कार्यालयांत सुविधा देणे बंधनकारक

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना आज सात कलमी कृती कार्यक्रम निश्चित करुन दिला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक यांच्याशी दुरदृष्य प्रणालीद्वारे संवाद साधला.**



यावेळी त्यांनी राज्यातील प्रशासनाला येत्या शंभर दिवसांत प्राधान्याने करावयाची कामे याबाबत सविस्तर सूचना दिल्या. या सूचनांवर काय कार्यवाही केली याबाबत १५ एप्रिल २०२५ रोजी आढावा घेतला जाईल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्व मंत्री उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना दिलेल्या सूचनांमध्ये, कार्यालयाचे संकेतस्थळ सुसज्ज करणे, माहिती अधिकार कायद्यानुसार मागितली जाईल अशी सर्व माहिती अगोदरच संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे, संकेतस्थळ सायबरदृष्ट्या सुरक्षित करणे, शासकीय कार्यालयांची स्वच्छता करणे, अनावश्यक कागदपत्रे काढून टाकणे आणि खराब व वापरात नसलेली वाहने निर्लेखित करणे यांचा समावेश आहे.यासह शासकीय कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याचे पाणी आणि स्वच्छ प्रसाधनगृहे उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही केल्या आहेत.

### प्रासधनगृहे स्वच्छ दिसले पाहिजे


यासाठी अधिकाऱ्यांच्या अचानक भेटी होतील, त्यावेळी पाण्याची उपलब्धता ते प्रासधनगृहे स्वच्छ दिसले पाहिजे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे यासाठी घेता किमान दोन सुधारणा, नाविन्यपूर्ण उपक्रम अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यालयात राबवावेत असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे. याचबरोब प्रलंबित कामांची संख्या शून्यावर कशी येईल, यासाठी प्रयत्न करण्यासही सांगितले आहे. अधिकारी नागरिकांना कधी उपलब्ध असतील याची माहिती फलकावर नमूद करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या आहेत.

# 'इंटरपोल'च्या धर्तीवर 'भारतपोल' पोर्टल !

## गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आम्ही काम करत राहू

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवारी सकाळी दिल्लीत भारतपोल पोर्टल लाँच केले. ते म्हणाले, भारतपोल आपल्या देशाचा आंतरराष्ट्रीय तपास एका नव्या युगात घेऊन जाईल. पूर्वी सीबीआय ही एकमेव एजन्सी होती जी इंटरपोलसोबत काम करण्यासाठी मान्यताप्राप्त होती, परंतु आता भारतपोलच्या माध्यमातून प्रत्येक भारतीय एजन्सी आणि सर्व राज्यांचे पोलीस इंटरपोलशी सहजपणे संपर्क साधू शकतील. गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आम्ही कार्यक्षमतेने काम करत राहू.**




सीबीआयनेच भारतपोलची निर्मिती केली आहे. इंटरपोलच्या धर्तीवर भारतपोल पोर्टल तयार करण्यात आले आहे. त्यामुळे तपास यंत्रणांना सायबर आणि आर्थिक गुन्ह्यांसह इतर गुन्ह्यांमध्ये आंतरराष्ट्रीय पोलिसांकडून तातडीने मदत मिळणार आहे. या पोलद्वारे राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे पोलीस परदेशात पळून गेलेल्या गुन्हेगारांची आणि गुन्ह्यांची माहिती इंटरपोलकडून घेऊ शकतील. इंटरपोलशिवाय इतर देशांच्या तपास यंत्रणांनाही जोडता येईल. गृह मंत्रालयाच्या अधिकाऱ्याने सांगितले की, सायबर गुन्हे, आर्थिक गुन्हे, ऑनलाइन दहशतवाद, संघटित गुन्हेगारी, ड्रग्ज तस्करी, मानवी तस्करी आदींसह आंतरराष्ट्रीय गुन्ह्यांची संख्या वाढत आहे. तपासादरम्यान अनेक वेळा इतर देशांची मदत घ्यावी लागते. तसेच, देशात गुन्हे करून परदेशात पळून गेलेल्या गुन्हेगारांना परत आणून त्यांना शिक्षा करणे हे आजही सुरक्षा यंत्रणांसमोर आव्हान आहे. यासाठी भारतीय एजन्सी इंटरपोलसह इतर परदेशी सुरक्षा संस्थांची मदत घेतात. आता भारतपोलच्या माध्यमातून इंटरपोल आणि इतर देशांतून गुन्हेगारांचा डाटा तत्काळ उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमात अमित शाह यांनी सीबीआयच्या 35 अधिकाऱ्यांना पोलीस पदक देऊन सन्मानित केले. या अधिकाऱ्यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदक आणि वेगवेगळ्या प्रकरणांच्या तपासासाठी केंद्रीय गृहमंत्री पदक प्रदान करण्यात आले आहे. रेड नोटीस जारी करण्याची प्रक्रिया सुलभ सध्या सीबीआय, इंटरपोल अधिकारी आणि एसपी, डीएसपी स्तरावरील युनिट अधिकाऱ्यांशी पत्रे, ईमेल आणि फॅक्सद्वारे माहिती शेअर केली जात होती. आता भारतपोल पोर्टलच्या मदतीने सीबीआय केंद्र आणि राज्य स्तरावरील इंटरपोल अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधू शकणार आहे. पोर्टलवरच माहिती शेअर केली जाईल. ईमेल किंवा फॅक्सची गरज भासणार नाही. आता देशातील सर्व यंत्रणा सायबर गुन्हे, आर्थिक गुन्हे, ऑनलाइन कट्टरतावाद, ड्रग्ज तस्करी, मानवी तस्करी यासारख्या गुन्ह्यांवर एकत्रितपणे गुन्हेगारांचा माग काढू शकतील. भारतपोलच्या मदतीने, राज्य पोलीस गुन्हेगारांविरुद्ध रेड नोटीस आणि इतर कलर कोड नोटिसा जारी करण्याची प्रक्रिया देखील सुलभ करू शकतील. सीबीआयनेच भारतपोलची निर्मिती केली आहे. इंटरपोलच्या धर्तीवर भारतपोल पोर्टल तयार करण्यात आले आहे. त्यामुळे तपास यंत्रणांना सायबर आणि आर्थिक गुन्ह्यांसह इतर गुन्ह्यांमध्ये आंतरराष्ट्रीय पोलिसांकडून तातडीने मदत मिळणार आहे. या पोलद्वारे राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे पोलीस परदेशात पळून गेलेल्या गुन्हेगारांची आणि गुन्ह्यांची माहिती इंटरपोलकडून घेऊ शकतील. इंटरपोलशिवाय इतर देशांच्या तपास यंत्रणांनाही जोडता येईल. गृह मंत्रालयाच्या अधिकाऱ्याने सांगितले की, सायबर गुन्हे, आर्थिक गुन्हे, ऑनलाइन दहशतवाद, संघटित गुन्हेगारी, ड्रग्ज तस्करी, मानवी तस्करी आदींसह आंतरराष्ट्रीय गुन्ह्यांची संख्या वाढत आहे.

### फॅक्सची गरज भासणार नाही

तपासादरम्यान अनेक वेळा इतर देशांची मदत घ्यावी लागते. तसेच, देशात गुन्हे करून परदेशात पळून गेलेल्या गुन्हेगारांना परत आणून त्यांना शिक्षा करणे हे आजही सुरक्षा यंत्रणांसमोर आव्हान आहे. यासाठी भारतीय एजन्सी इंटरपोलसह इतर परदेशी सुरक्षा संस्थांची मदत घेतात. आता भारतपोलच्या माध्यमातून इंटरपोल आणि इतर देशांतून गुन्हेगारांचा डाटा तत्काळ उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमात अमित शाह यांनी सीबीआयच्या 35 अधिकाऱ्यांना पोलीस पदक देऊन सन्मानित केले. या अधिकाऱ्यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदक आणि वेगवेगळ्या प्रकरणांच्या तपासासाठी केंद्रीय गृहमंत्री पदक प्रदान करण्यात आले आहे. रेड नोटीस जारी करण्याची प्रक्रिया सुलभ सध्या सीबीआय, इंटरपोल अधिकारी आणि एसपी, डीएसपी स्तरावरील युनिट अधिकाऱ्यांशी पत्रे, ईमेल आणि फॅक्सद्वारे माहिती शेअर केली जात होती. आता भारतपोल पोर्टलच्या मदतीने सीबीआय केंद्र आणि राज्य स्तरावरील इंटरपोल अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधू शकणार आहे. पोर्टलवरच माहिती शेअर केली जाईल. ईमेल किंवा फॅक्सची गरज भासणार नाही.

# राजीव कुमार यांची ठाकरेंवर टीका

## हेलिकॉप्टर तपासलं गेल्यावर काहींनी घाणेरडी : राजीव कुमार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय निवडणूक आयोगाने दिल्ली विधानसभा निवडणुकीचे वेळापत्रक आज दुपारी २ वाजता पत्रकार परिषदेत जाहीर केले. ७० आमदार असलेल्या दिल्ली विधानसभेचा कार्यकाळ २३ फेब्रुवारी रोजी संपणार आहे. दरम्यान निवडणूक आयोगाने निवडणुकीची घोषणा केल्यानंतर दिल्लीत आचारसंहिता लागू झाली आहे. दिल्लीत ५ फेब्रुवारीला मतदान पार पडणार आहे. तर ८ फेब्रुवारीला निकाल लागणार आहे.**



दिल्ली विधानसभा निवडणुका जाहीर करताना मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी, ईव्हीएम मधील छेडछाड, मतदार याद्यांमधील घोळ आणि वाढलेल्या मतदानाच्या टक्केवारीवर करण्यात आलेले सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. यावेळी त्यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी शेवटच्या पाच तासांत मतदानाची टक्केवारी कशी वाढली याबाबतही स्पष्टीकरण दिले. दिल्ली विधानसभेची निवडणूक जाहीर करताना निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले, "ईव्हीएममध्ये कोणत्याही त्रुटीचा कोणताही पुरावा नाही. त्यामुळे ईव्हीएममध्ये व्हायरस किंवा बग असण्याचा तसेच मतमोजणीमध्ये काही छेडछाड करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. देशातील उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयाने सातत्याने हेच सांगितले आहे की, ईव्हीएम टेम्परिंगचे आरोप निराधार आहेत." असं राजीव कुमार म्हणाले. आरोप करताना हवेत गोळीबार करण्याची गरज नाही. तुम्ही पुरावा दाखवा, या ठिकाणी असं घडून येतं आहे हे सांगा आम्ही कारवाई करु. मागच्या म्हणजेच महाराष्ट्राच्या निवडणुकीच्या दरम्यान एक हो हल्ला पाहण्यास मिळाला.

### महिलांच्या विरोधात बोलू नका

घाणेरड्या भाषेचा उपयोगही केला गेला. आम्ही उत्तर दिलं नाही संयम ठेवला. मतदानाच्या ठिकाणी असलेल्या अधिकाऱ्यांना धमक्या देण्यापर्यंत काहींची मजल गेली. मात्र आम्ही शांत बसलो. स्टार प्रचारक आणि राजकीय नेते यांनी शिष्टाचार आणि सभ्यता पाळली पाहिजे. महिलांच्या विरोधात बोलू नका, मुलांच्या विरोधातही काहींनी भाष्य केलं. अशा लोकांना आमची हात जोडून विनंती आहे की प्रचाराची पातळी एवढी घसरु देऊ नका की त्यामुळे मतदानाला येण्याची नव्या पिढीची इच्छाच निघून जाईल.

# सर्व जण मी अपयशी होण्याची वाट बघत आहेत

‘बडे अच्छे लगते है’ या मालिकेतून प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणारा अभिनेता म्हणून राम कपूर(RAM KAPOOR) ची ओळख आहे. राम कपूर काही दिवसांपासून मोठ्या चर्चेत आहे. त्याने त्याचे वजन कमी करीत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. टीव्हीवर सर्वात जास्त मानधन घेणाऱ्या कलाकारांपैकी एक, अशी त्याची ओळख आहे. अभिनेत्याने काही हिंदी चित्रपटांतदेखील काम केले आहे. आता नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत राम कपूरने त्याच्या खासगी आयुष्याविषयी वक्तव्य केले आहे. एका श्रीमंत घरात जन्मल्याने त्याला त्याचा मोठा फायदा झाला. ॲड गुरू व श्रीमंत उद्योजक दिवंगत अनिल कपूर यांचा राम कपूर मुलगा आहे. राम कपूरने जेव्हा अभिनय क्षेत्रात काम करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी वडील – मुलाच्या नात्यात तणाव निर्माण झाला. त्यांच्यात दुरावा आला. हा दुरावा जवळजवळ १० वर्षे होता, असे अभिनेत्याने सांगितले आहे. राम कपूरने नुकतीच सिद्धार्थ कननला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्याने म्हटले, “एका श्रीमंत व्यक्तीचा मी एकुलता



एक मुलगा होतो. जेव्हा मी मोठा होत होतो, त्यावेळी मला त्याचा खूप फायदा झाला. पण, शाळेनंतर मी त्यांना सांगितले की, मला त्यांची कंपनी पुढे चालवायची नाही. मला माझे स्वत:चे काहीतरी निर्माण करायचे आहे. त्यामुळे वडिलांच्या श्रीमंतीचे मला जे फायदे मिळत होते, त्यापासून मी दूर गेलो. कारण- मला माझा स्वत:चा मार्ग शोधायचा होता. त्यामध्ये माझी १० वर्षे गेली. त्यानंतर मी काम करण्यास सुरुवात केली.”पुढे राम कपूरने पुढे असेही सांगितले की, त्याला शाळेत असल्यापासूनच अभिनय क्षेत्रात करिअर करायचे होते. मात्र, वडिलांनी त्याकडे फारसे लक्ष दिले नाही. राम कपूरने म्हटले, “जेव्हा मी १३-१४ वर्षांचा होतो, तेव्हाच मला अभिनेता व्हायचे होते, असे वडिलांना सांगितले होते. विशेषत: मी खूप लहान होतो आणि ते खूप मोठी व्यक्ती होते. त्यांची कंपनी त्यांच्यासाठी वारसा होती. त्यांच्या एकुलत्या एका मुलाने ती कंपनी पुढे चालवावी, असे त्यांना वाटत होते. त्यामुळे मी जेव्हा त्यांना सांगितले की, मला त्यांची कंपनी पुढे चालवायची नाही. त्यावेळी ते कोणत्या दु:खातून गेले असतील, याची मला जाणीव आहे. त्यानंतर मी अमेरिकेला गेलो आणि तिथे माझ्या आवडीच्या ॲक्टिंग स्कूलमध्ये दाखल झालो. मी ग्रॅज्युएट झालो आणि कामासाठी मी लोकांना भेटण्यास सुरुवात केली. मला माझ्या वडिलांनाच नाही, तर संपूर्ण कुटुंबासमोर हे सिद्ध करून दाखवायचे होते की, मी हे करत आहे.

## शाहरुख खानची ‘मन्नत’ पूर्ण

सुप्रसिद्ध अभिनेता शाहरुख खान याच्या वांद्रे येथील मन्नत बंगल्यावर आणखी दोन मजले वाढणार आहेत. राज्याच्या पर्यावरण विभागाने नुकतीच याबाबतच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. त्यामुळे बंगल्याच्या विस्तारिकरणाची शाहरुखची ‘मन्नत’ अखेर पूर्ण होणार आहे. बॉलिवूडचा स्टार असलेल्या शाहरुख खानचा वांद्रे येथील बंगला नेहमीच चर्चेत असतो.माउंट मेरी कडे जाणाऱ्या रस्त्यावरचा हा बंगला शाहरुखच्या चाहत्यासाठीही आकर्षणाचा विषय आहे. सध्या सहा मजल्यांचा असलेला हा बंगला आता लवकरच आणखी उंच होणार आहे. या बंगल्याच्या वर आणखी दोन मजले वाढण्यासाठी महाराष्ट्र सागरी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (एमसीझेडएमए) नुकतीच परवानगी दिली आहे. शाहरुखची पत्नी गौरी खान हिने या परवानगीकरिता संबंधित विभागाकडे अर्ज केला होता.

## साराची ज्योतिर्लिंगाला भेट

‘केदारनाथ’ चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण करणारी अभिनेत्री सारा अली खान सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय आहे. ती तिच्या चित्रपटांच्या पोस्ट तसेच सुट्टीवर गेल्यावर तिथले क्षण चाहत्यांबरोबर शेअर करत असते. साराने तिच्या नवीन वर्षाची सुरुवात भगवान शंकराच्या दर्शनाने केली आहे. तिने ‘श्रीशैलम मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग’ (आंध्र प्रदेश) या मंदिरात जाऊन घेतलेल्या दर्शनाचे फोटो शेअर केले असून तिच्या चाहत्यांनी या फोटोवर कमेंट करत तिचे कौतुक केले आहे.सारा अली खानने तिच्या इन्स्टाग्रामवर नवीन वर्षाच्या पहिल्या सोमवारी (२०२५) श्रीशैलम मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंगाच्या भेटीचे काही फोटो शेअर केले. वेगवेगळ्या धार्मिक स्थळांना भेट देणाऱ्या आणि तिथून अपडेट्स शेअर करणाऱ्या साराच्या या फोटोंना चाहत्यांकडून मोठा प्रतिसाद मिळाला आहे.अलीकडेच सारा अली खानच्या ‘स्काय फोर्स’ या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला. या ट्रेलरच्या रिलीजच्या दुसऱ्याच दिवशी तिने आंध्र प्रदेशातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्रीशैलम मल्लिकार्जुन मंदिरात जाऊन महादेवाचे दर्शन घेतले. साराने शेअर केलेल्या फोटोमध्ये ती पारंपरिक पांढऱ्या पोशाखात दिसत होती. तिने फोटो पोस्ट करत कॅप्शन लिहिले, “साराच्या वर्षाचा पहिला सोमवार, जय भोलेनाथ.”चाहत्यांनी तिच्या पोस्टवर प्रेमाचा वर्षाव केला. एका चाहत्याने लिहिले, “सारासाठी खूप आदर,” तर दुसऱ्याने लिहिले, “तुझी महादेवाच्या आशीर्वादाने भरभराट होईलसारा अली खान याआधीही अनेक ज्योतिर्लिंगांना भेट दिली आहे.याचे फोटो तिने तिच्या सोशल मीडिया अकाउंटवरून शेअर केले होते. यामुळेच साराच्या या पोस्टवर तिच्या एका चाहत्याने “आणखी एक ज्योतिर्लिंग पूर्ण!!!” आणि “तुझा खूप अभिमान वाटतो.



## मला वाटलं माझं करिअर संपलं

संजय कपूरने १९९५ मध्ये ‘प्रेम’ चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं होतं. या सिनेमात तब्बूदेखील होती. पण हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरला. पहिल्या सिनेमानंतर तीन आठवड्यांनी संजयचा ‘राजा’ रिलीज होणार होता. पहिल्या चित्रपटाच्या खराब कामगिरीमुळे अनेकांना वाटलं की संजयचं करिअर सुरू होण्याआधी संपलंय. तसेच ‘राजा’चे दिग्दर्शक इंद्र कुमार यांनाही वाटलं की संजय कपूरमुळे चित्रपट फ्लॉप होणार आणि त्यांचं निर्माता म्हणून करिअर संपलंय. मात्र सिनेमा सुपरहिट ठरला.इंद्र कुमार सिद्धार्थ कन्ननला म्हणाले, “दोन हिट चित्रपट दिल्यानंतर मी राजा पुन्हा शूट केला. जेव्हा मी मूळ चित्रपट पाहिला तेव्हा मला काही दृश्ये समजली नाहीत. मला माझी चूक लक्षात आली, म्हणून मी स्क्रिप्ट पुन्हा लिहून पुन्हा शूट केले. तो सिनेमाही सुपरहिट झाला.”पुढे ते म्हणाले, “राजा रिलीज होण्याच्या फक्त तीन आठवड्यांपूर्वी, तब्बू व संजय कपूरचा आणखी एक चित्रपट रिलीज झाला होता. पण तो फ्लॉप झाला. लोक माझी खिल्ली उडवू लागले. मीदेखील आशा गमावली होती. माझ्या मनात विचार आला, ‘इंद्र कुमार, हा तुझा शेवटचा चित्रपट समज. यानंतर हरिद्वारला जावं लागणार.’ माझ्या सिनेमाचा हिरो संजय कपूर होता, ज्याचा मागील चित्रपट फ्लॉप झाला होता, त्यामुळे सगळे त्याच्याबद्दल बोलत होते. त्याचा माझ्या चित्रपटावर वाईट परिणाम होऊ शकतो. मी आशा सोडली होती. पण, माधुरी दीक्षित, सरोज खान आणि माझ्या लेखकांचे आभार, त्यांच्यामुळे हा चित्रपट हिट झाला.

## राशाच्या जबरदस्त डान्सने वेधलं लक्ष

बॉलीवूडच्या कलाकारांची मुलं आता मोठ्या पडद्यावर पाहायला मिळत आहेत. २०२३मध्ये शाहरुख खानची मुलगी सुहाना खान, अमिताभ बच्चन यांचा नातू अगस्त्य नंदा, श्रीदेवींची मुलगी खुशी कपूर यांनी बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. त्यानंतर गेल्या वर्षी आमिर खानचा मुलगा जुनैद खानने ‘महाराज’ चित्रपटाच्या माध्यमातून इंडस्ट्रीत पाऊल ठेवलं. आता रवीना टंडनची १९ वर्षांची मुलगी मोठ्या पडद्यावर झळकण्यासाठी सज्ज झाली आहे. तिच्या पहिल्या-वहिल्या चित्रपटातील गाणं प्रदर्शित झालं असून तिच्या जबरदस्त डान्सने सगळ्यांचं लक्ष वेधलं आहे. नेटकरी रवीना टंडनच्या मुलीची तुलना सुहाना खान, खुशी कपूरसह कतरिना कैफबरोबर करत आहेत. रवीना टंडनच्या १९ वर्षीय मुलीचं नाव राशा थडानी आहे. ती ‘आजाद’ या चित्रपटाच्या माध्यमातून बॉलीवूडमध्ये पदार्पण करण्यासाठी तयार झाली आहे. याच चित्रपटातील तिचं पहिलं गाणं ‘उई अम्मा’ प्रदर्शित झालं आहे. या गाण्यावर राशाचा डान्स पाहून नेटकरी भरभरून कौतुक करत आहेत. तिने आपल्या डान्ससह हावभावाने सगळ्यांची मनं जिंकली आहेत.राशा थडानीचं ‘उई अम्मा’ गाणं ४ जानेवारीला प्रदर्शित झालं. मधुबंती बागने हे गाणं गायलं असून अमित त्रिवेदीने संगीतबद्ध केलं आहे. तर अमिताभ भट्टाचार्य गीतकार आहेत. या गाण्यातील जबरदस्त डान्समुळे राशा चांगलीच भाव खाऊन गेली आहे. त्यामुळेच तिचं कौतुक होतं आहे.राशाचं ‘उई अम्मा’ गाणं पाहून एका नेटकऱ्याने लिहिलं की, हे खरं पदार्पण आहे. तिचे हावभाव जबरदस्त आहेत. तर दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, “सुहाना खान आणि खुशी कपूरपेक्षा राशाने खूप छान परफॉर्मन्स केला आहे.



# हो माझी चूक होती : कॉन्स्टास

## कसोटीत बुमराह आणि सॅम कॉन्स्टासमध्ये झाला होता वाद

।नवी दिल्ली। वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत वि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळवल्या गेलेल्या पाचव्या आणि अखेरच्या कसोटीत भारताचा गोलंदाज बुमराह आणि ऑस्ट्रेलियाचा युवा फलंदाज सॅम कॉन्स्टास यांच्यात वाद झाला होता. सिडनीमध्ये खेळल्या गेलेल्या शेवटच्या सामन्याच्या पहिल्या दिवसाच्या अखेरीस दोघे एकमेकांशी भिडले आणि पंचांना हस्तक्षेप करावा लागला. आता १९ वर्षांच्या कॉन्स्टासने याबाबत आपली चूक मान्य केली आहे.**




सिडनी कसोटीच्या पाचव्या दिवसाच्या अखेरीस ऑस्ट्रेलियाने भारताला सर्वबाद केलं आणि कांगारू संघाचे फलंदाज फलंदाजीसाठी उतरले. यानंतर भारताने झटपट खेळ सुरू केला आणि शक्य तितक्या षटकांचा खेळ झाला पाहिजे हा भारताचा प्रयत्न होता. तर नॉन स्ट्राईकर एंडवर उभ्या असलेल्या उस्मान ख्वाजा वेळ काढू पाहत होता. बुमराहने यावर पंचांना प्रश्न केला. त्यानंतर नॉन स्ट्रायकर एंडला उभ्या असलेल्या कॉन्स्टासने बुमराहशी मुद्दाम वाद घालण्यास सुरूवात केली आणि त्यानंतर बुमराहनेही त्याला प्रत्युत्तर दिले. या वादावादीमध्ये दुसऱ्याच चेंडूवर उस्मान ख्वाजाने आपली विकेट गमावली होती.बुमराह आणि कॉन्स्टास यांच्यात झालेल्या या वादावर अनेकांना विविध प्रतिक्रिया दिल्या. १९ वर्षीय खेळाडूला भारतीय संघाने धमकावल्याचेही अनेक जण म्हणाले. पण आता ऑस्ट्रेलियाच्या या १९ वर्षीय खेळाडूनेच त्याची चूक असल्याचे मालिकेनंतर मान्य केले आहे. या विजयाच्या काही दिवसांनंतर आता कॉन्स्टासने बुमराहसोबतच्या लढतीवर आपले मत व्यक्त केले असून आपल्याकडून चूक झाल्याचे म्हटले आहे. मैदानावर झालेल्या वादांमुळे मैदानावरील स्पर्धा वाढते का, यावर उत्तर देताना तो म्हणाला, “या गोष्टीचा माझ्यावर फारसा परिणाम होत नाही. दुर्दैवाने उस्मान ख्वाजा बाद झाला. तो तिथे वेळ काढण्याचा प्रयत्न करत होता. पण ही माझी चूक होती. मी बुमराहला उकसवल्यामुळे तो बाद झाला, पण अशा घटना घडतात. हे क्रिकेट आहे. पण या विकेटचं श्रेय बुमराहला जातं. त्याने विकेट मिळवली, पण एकंदरीतच आमच्या संघाने चांगली कामगिरी केली,” असं कॉन्टसने ट्रिपल एमला सांगितले. बुमराहविरुद्ध कॉन्स्टासने या मालिकेत चांगली कामगिरी केली आहे. त्याने बुमराहविरुद्ध जबरदस्त कामगिरी करत मोठमोठे फटके खेळले. बुमराहच्या गोलंदाजीवर त्याने षटकार लगावण्याचे धैर्य दाखवत मोठे फटके खेळले पण त्यानंतर बुमराहने त्याला मोठी खेळी करण्याची संधी दिली.सिडनी कसोटीच्या पाचव्या दिवसाच्या अखेरीस ऑस्ट्रेलियाने भारताला सर्वबाद केलं आणि कांगारू संघाचे फलंदाज फलंदाजीसाठी उतरले. यानंतर भारताने झटपट खेळ सुरू केला आणि शक्य तितक्या षटकांचा खेळ झाला पाहिजे हा भारताचा प्रयत्न होता. तर नॉन स्ट्राईकर एंडवर उभ्या असलेल्या उस्मान ख्वाजा वेळ काढू पाहत होता. बुमराहने यावर पंचांना प्रश्न केला. त्यानंतर नॉन स्ट्रायकर एंडला उभ्या असलेल्या कॉन्स्टासने बुमराहशी मुद्दाम वाद घालण्यास सुरूवात केली आणि त्यानंतर बुमराहनेही त्याला प्रत्युत्तर दिले. या वादावादीमध्ये दुसऱ्याच चेंडूवर उस्मान ख्वाजाने आपली विकेट गमावली होती.बुमराह आणि कॉन्स्टास यांच्यात झालेल्या या वादावर अनेकांना विविध प्रतिक्रिया दिल्या. १९ वर्षीय खेळाडूला भारतीय संघाने धमकावल्याचेही अनेक जण म्हणाले.या विजयाच्या काही दिवसांनंतर आता कॉन्स्टासने बुमराहसोबतच्या लढतीवर आपले मत व्यक्त केले असून आपल्याकडून चूक झाल्याचे

### संघाने चांगली कामगिरी केली

मैदानावर झालेल्या वादांमुळे मैदानावरील स्पर्धा वाढते का, यावर उत्तर देताना तो म्हणाला, “या गोष्टीचा माझ्यावर फारसा परिणाम होत नाही. दुर्दैवाने उस्मान ख्वाजा बाद झाला. तो तिथे वेळ काढण्याचा प्रयत्न करत होता. पण ही माझी चूक होती. मी बुमराहला उकसवल्यामुळे तो बाद झाला, पण अशा घटना घडतात. हे क्रिकेट आहे. पण या विकेटचं श्रेय बुमराहला जातं. त्याने विकेट मिळवली, पण एकंदरीतच आमच्या संघाने चांगली कामगिरी केली,” असं कॉन्टसने ट्रिपल एमला सांगितले. बुमराहविरुद्ध कॉन्स्टासने या मालिकेत चांगली कामगिरी केली आहे. त्याने बुमराहविरुद्ध जबरदस्त कामगिरी करत मोठमोठे फटके खेळले. बुमराहच्या गोलंदाजीवर त्याने षटकार लगावण्याचे धैर्य दाखवत मोठे फटके खेळले पण त्यानंतर बुमराहने त्याला मोठी खेळी करण्याची संधी दिली.भारत वि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळवल्या गेलेल्या पाचव्या आणि अखेरच्या कसोटीत भारताचा गोलंदाज बुमराह आणि ऑस्ट्रेलियाचा युवा फलंदाज सॅम कॉन्स्टास यांच्यात वाद झाला होता.

# फर्ग्युसन आवरला नाही : बुमराहची ॲक्शन

## फर्ग्युसनची गोलंदाजी पाहून मार्क वॉ यांना बुमराहची आठवण झाली

।नवी दिल्ली। वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जसप्रीत बुमराहने ऑस्ट्रेलियाविरूद्ध नुकत्याच झालेल्या बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये जबरदस्त कामगिरी केली आहे. जसप्रीत बुमराह ऑस्ट्रेलियन फलंदाजांसाठी या मालिकेत कर्दनकाळ ठरला. बुमराहने पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत विक्रमी ३२ विकेट्स घेतल्या. ऑस्ट्रेलियाच्या मैदानावरील फलंदाजांपासून ते समालोचकांपर्यंत सर्वांनीच बुमराहच्या गोलंदाजीचा धसका घेतला.**




पण आता बॉर्डर गावस्कर स्पर्धा संपली असूनही बुमराहच्या भेदक गोलंदाजीची हवा मात्र ऑस्ट्रेलियात कायम आहे. बुमराहच्या वेगवान गोलंदाजीची हवा ऑस्ट्रेलियामध्ये अजूनही कायम असल्याचे दिसत आहे. सध्या सुरू असलेल्या बिग बॅश लीग २०२४-२५ च्या सामन्यात बुमराहचा उल्लेख केला गेला. बीबीएलमधील ब्रिस्बेन हिट वि सिडनी थंडर सामना गाबाच्या मैदानावर खेळला गेला. या सामन्यातील लॉकी फर्ग्युसनच्या एका चेंडूने सिडनी थंडरच्या फलंदाजाला चकित केलं. या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा माजी खेळाडू मार्क वॉ समालोचन करत होते. मार्क वॉ यांनी फर्ग्युसनची गोलंदाजी पाहून त्याने थेट बुमराहसारखी गोलंदाजी केल्याचे म्हटले. बीबीएलमधील या सामन्यात समालोचन पॅनलचा भाग असलेले मार्क वॉ यांनी हा जबरदस्त चेंडू जसप्रीत बुमराहच्या गोलंदाजीशी कनेक्शन जोडलं. फर्ग्युसन हा एक वेगवान गोलंदाज आहे. गोलंदाजी करण्याआधी त्याने बुमराहसारखा रनअप घेतल्याचं मार्क वॉ म्हणाले.

### बुमराह गोलंदाजी करत असल्याचं वाटलं

हंगामातील २५व्या सामन्यात थंडर वि हीटच्या सामन्यात फर्ग्युसनने उत्कृष्ट गोलंदाजी केली. संघाचा सलामीवीर जॅक वूडला धारदार चेंडू टाकून त्याचा त्रिफळा उडवला आणि अवघ्या २ धावांवर त्याला बाद केले. फर्ग्युसनची गोलंदाजी पाहून मार्क वॉ यांना बुमराहची आठवण झाली. गेले २ महिने सातत्याने सामन्यांमध्ये बुमराहची गोलंदाजी त्यांनी पाहिली होती. दरम्यान फर्ग्युसनचा रनअप पाहून वॉ म्हणाले, त्याचा रन अप पाहून जसप्रीत बुमराह गोलंदाजी करत असल्यासारखं वाटलं.